27:4

ANNUAL REPORT

OF THE

Hume Memorial Church, Bombay.

(United Church of Northern India).

October 1926 to September 1927.

Church Centenary :—With deep humility and gratitude we come before the Throne of Grace at the end of a full century—humility for our unworthiness and shortcomings and gratitude for His preservation and growth of this flock. Knowing the small beginnings of this flock we are reminded of our Lord's words : *'Fear not little flock ; for it is your Father's good pleasure to give you the Kingdom.'*

For some time now we have been planning to celebrate this great and momentous event in a fitting manner, and from the commencement of this year we are preparing ourselves by meeting together for special prayer on Sundays after the Service, as well as at the mid-week Prayer Meetings.

The celebration will take place during the first week of December.

Prayer Band :—Our chief source of strength comes from *'two or three gathered together' in His name* daily except Mondays at day-break. The chief theme of our prayers has been for a revival in the Church of God in our beloved country, commencing with our Church. We are thankful to say that signs are evident, though on the distant horizon. One of the answers to these humble but earnest petitions is the healthy tone of the spiritual life of this Church.

Evangelism : Another answer to these prayers is that the Church has undertaken the support of an evangelistic worker in this City. During the last year and a quarter this worker

disseminated the Word of God by selling 2744 Gospel portions. He also helps the Pastor in conducting open-air evangelistic meetings as well as in Church visitation.

Last summer two week-end trips were undertaken through the suburbs up to Kalyan. Magic lantern slides on the life of Christ were exhibited and a large number of Scripture portions sold and tracts distributed. In these campaigns a few voluntary workers of the Church also joined.

The Pastor has also been helping regularly in the evangelistic work carried on by the Bombay Missionary Conference among the educated classes in a tent on Chowpatty Sea Face during the fair season. During the monsoons these meetings were held in the Bowen Memorial Hall of the Student Branch Y. M. C. A.

Hundreds and thousands of tracts in various languages have been freely distributed on Railway trains, tram-cars, on the streets and in fairs and festivals. It has been our sweet privilege to note that people as a rule gladly respond and willingly hear the Gospel message.

Easter Services :—Special services were held during Easter week, special features being a three-hour Service at noon on Good Friday, held for the first time in the history of the Church, and an Easter morning service at daybreak on Mazagon Hill. There was a ready response to both and the former particularly was crowded by an attentive congregation who sat right through the Service.

Nagpada Neighbourhood House :—Since its opening this House has been well patronised by a large number belonging to all classes, communities and creeds who resort to the place for diverse purposes—physical, social, economic and educational. It is an open door for service for our Church members, as well as for the Christian section of the Hostellers

to render service to the Church in various Christian activities.

Mission High School :—Since its commencement this valuable institution with its Boarding departments has been the chief feeder of the Church as was the wish of its founders Rev. and Mrs. E. S. Hume who sacrificed themselves for building up this school. Most of the leading members of the Church have had their education in this institution. Under the Principalship of the Senior Elder of this Church the School has reached a high level of prosperity. It is a matter of great satisfaction that the Principal and his wife are paying special attention to the religious education of the children.

The Jubilee celebrations of the School will be held at the same time as the Church Centenary.

Church Centenary Fund :—As a fitting thanksgiving for a century of service, and as a mark of gratitude for the past the Church has undertaken to raise a Centenary Fund. A sum of Rs. 5,000 has been pledged by far the greater portion being pledged by members of the Church out of their poverty, and in addition to their obligations for the maintenance of regular Church interests and other demands for Evangelistic work etc. The total collection upto 30th Sept. 1927 amounts to over Rs. 2,800. This has been the result of real self-sacrifice on the part of many.

Church Finances:—The financial statement appended to this report will show that we are just able to meet our expenses. Taking into consideration, however, the heavy demands upon our people for Evangelistic work, Centenary Fund, etc., this cannot be said to be unsatisfactory. The Church has this year given in all Rs. 4,617 for all objects. It is a matter of great satisfaction to note that some of our

members set apart their actual tithes and give readily to various objects.

Individual Service :—A brother, out of love for the House of Worship has put up a fine railing round the pulpit at considerable expense. Another paid for the binding of the Church hymn-books and a Bible. A sister as a thanks-offering has supplied a number of Psalm books. A poor widow remembering the poor and the needy has been giving her mite from time to time for poor relief. A copy of the Marathi Revised Version of the Bible was placed in the Pastor's study for his use by an anonymous donor. The Church Electric installation is looked after by another brother who also renders service to the Church in various other ways. In addition to these there are a number of others who are rendering voluntary service in various ways.

The Church has communicant membership of 329. 17 new members were admitted on faith during the year, and 10 by letter of transfer from other Churches. The number of children is 197, adherents 55. In all the Christian Community numbers 581

In conclusion, at the end of the century the Lord says to this Church as well as to its individual members :—'*Whosoever will come after me let him deny himself and take up his cross and follow me.*' Again he says : '*All power is given unto me in heaven and on earth. Go ye, therefore, and teach all nations. Go I am with you always, even unto the end of the world.*' If this Church is alive to its obligations, obeying our Lord and Master, it will live and bear fruit and bring others to the saving knowledge of its Lord and Saviour.

हिंदिस्थानच्या उत्तरभागच्या संयुक्त चर्चसंबंधांतील

ह्यूम मेमोरियल चर्चचा वार्षिक अहवाल.

ऑक्टोबर १९२६ ते सेप्टेंबर १९२७ अखेर.

शतवर्ष—ह्या साली या मंडळीची स्थापना होऊन पुरें एक शतक झालें आहे. हा शतवर्षोत्सव येत्या दिसेंबरांत ता. ७–११ पर्यंत होणार आहे. ह्या दीर्घ काळांत जो **प्रभु 'काल आज व सर्वकाळ सारखाच आहे'** त्यानें आपल्या परम दयेनें व सामर्थ्यानें ही मंडळी सुरक्षित राखिली आहे म्हणून आम्ही मोठ्या नम्रतेनें व कृतज्ञतेनें त्या **सर्व समर्थाची** उपकारस्तुति करितों. ज्यानें म्हटलें आहे **'हे लहान कळपा, भिऊं नको, कारण तुम्हांस राज्य द्यावें यांत तुमच्या बापाचा संतोष आहे'** त्याच सनातन **प्रभूनें** त्या लहान कळपास ह्या अफाट व भयंकर जगदरण्यांतून सिंहव्याघ्रादि वनपशूंच्या दाभाडांतून राखिलें आहे इतकेंच नव्हे तर या शतकांतून वाचविलें आहे म्हणून आम्ही त्याचें मनःपूर्वक धन्यवाद करितों. हें कांहीं आमच्या **'बळानें नाहीं, पराक्रमानें नाहीं, तर माझ्या आत्म्यानें असें सैन्यांचा यहोवा म्हणतो.'**

जरी शतवर्षोत्सवाचा विचार उणेंअधिक अडीच वर्षांपासून ही मंडळी करीत आहे तरी ह्या वर्षारंभापासून विशेष आग्रहाच्या प्रार्थना आपली आध्यात्मिक दृष्टया तयारी व्हावी म्हणून ही करीत आहे. या वर्षीच्या मार्च महिन्यांत हा उत्सव व्हावा म्हणून मंडळीची प्रथम योजना होती परंतु प्रार्थनापूर्वक आपली अधिक तयारी व्हावी म्हणून येत्या दिसेंबरांत हा पार पाडावा म्हणून ठरविलें आहे. याप्रमाणें दर रविवारीं संध्याकाळचे उपासनेनंतर व शुक्रवारचे प्रार्थनेचे सभेचेवेळीं या मंडळींत आग्रहानें व कळकळीनें प्रार्थना होत आहेत.

प्रार्थना संघ—याशिवाय या मंडळींतील 'दोघे किंवा तिघे' हिच्यांत धर्मसंजीवन व्हावें म्हणून ५॥ वर्षांपासून दर सोमवारीं संध्याकाळीं मंदिरांत

प्रभूचे नांवानें एकत्र होऊन प्रार्थना करीत असत व २॥ वर्षांपासून सोमवार सोडून रोज पहाटेस नित्यक्रमानें प्रार्थना करीत असतात. या कित्येक प्रार्थनांचीं उत्तरें सर्वसमर्थ **प्रभूनें** आम्हांस दिलीं आहेत व राहिलेलीं उतरें आम्हांस मिळणार आहेत म्हणून विश्वासानें आम्ही वाट पाहात आहों.

शुभवृत्त प्रसार—वरील प्रार्थनांपैकीं आमची ही एक प्रार्थना असें कीं ह्या मंडळीद्वारें शुभवृत्त प्रसाराचें काम अधिक व्हावें. याचें उत्तर म्हणून या मंडळीचे वतीनें एक अनुभविक व नम्र सेवक प्रभूनें पाठवून त्याची या सेवेचे कामीं योजना केली आहे. चंद्रभानजी चक्कनारायण या बंधूनीं १ वर्ष व चार महिन्यांत २७४४ शुभवर्तमानें निरनिराळ्या भाषांत विकलीं. तसेंच मंडळीचे पाळकाबरोबर रस्त्यावरच्या उपदेशाच्या कामीं व मंडळींतील भावाबहिणींच्या भेटी घेण्याचे कामीं यांची मदत असते. तसेंच प्रसंगानुसार शुभवृत्तप्रसाराचे कामीं मंडळीतील कित्येक भावांनीं मदत केली आहे. गेल्या उन्हाळ्यांत कल्याण पर्यंत दोन दोन दिवसांच्या दोन फेऱ्या करून व मधलीं गांवें फिरून व त्यांत म्याजिक ल्यांटर्न दाखवून शुभवृत्तप्रसार करण्याचे कामीं मंडळींतील कित्येक भावांनीं मदत केली. तसेंच विशेष सणावारांचे दिवशीं या शहरांत यात्रेचे स्थळीं या मंडळीचे वतीनें शुभवृत्तप्रसार करण्यांत आला आहे. तसेंच चौपाटी वरील तंबूंत व पावसाळ्यांत गिरगावांतील वाय. एम्. सी. ए. च्या सभागृहांत सुशिक्षित लोकांत शुभवृतप्रसाराचे कामीं या मंडळीचे पाळकानें नियमित रीतीनें मदत केली आहे. बऱ्यावशा पवित्र शास्त्राच्या प्रती व उपासना संगीताचीं पुस्तकें यांचा प्रसार या मंडळींत झाला आहे. तसेंच हजारों पत्रिका रस्त्यानें जाता येतां, आगगाडींतून, ट्रामगाडींतून निरनिराळ्या भाषांत वाटण्यांत आल्या आहेत. देवाच्या ह्या 'जिवंत व समर्थ' वचनाची जी पेरणी झाली त्याचप्रमाणें त्याचें बीजारोपण होऊन त्याची वाढ होणें हें त्या समर्थ **प्रभूच्या** हातीं आहे. 'पाहा पेरणारा पेरायास निघाला' याप्रमाणें ह्या मंडळीचें काम पेरण्याचें आहे. या शुभवृत्तप्रसाराचे कामीं जो गोड अनुभव आम्हांस आजपर्यंत आला त्यावरून प्रभूचे वचनाची सत्यता आम्हांस पदोपदीं पटते. प्रभु आपले शिष्यांस म्हणत 'तुम्ही आपले डोळे वर करून शेतांकडे पाहा, कां कीं...तीं पांढरीं होऊन कापणीस आलीं आहेत...पीक खरोखर फार आहे

परंतु कामकरी थोडे आहेत'. या मंडळींतील प्रत्येक बंधुभगिनींचें हें पवित्र कार्य आहे. प्रभूची आज्ञा या मंडळीस आहे 'तुम्ही अवघ्या जगांत जाऊन सर्व सृष्टीला शुभवर्तमान गाजवा.'

ईस्टरसंबंधी उपासना—एप्रिल १४ गुरुवारीं सायंकाळीं, शुभ शुक्रवारीं दुपारीं, शनिवारीं सायंकाळीं, पुनरुत्थानाचे पहाटेस माजगांव टेंकडीवर, नंतर सकाळीं ९ वाजतां मंदिरांत व नित्याप्रमाणें सायंकाळीं अशा या उपासना झाल्या. शुभ शुक्रवारचे दुपारीं या वर्षी तीन तासांची उपासना या मंडळींत प्रथमतःच होऊन क्रुसावरील सात वचनांवर संदेश देण्यांत आले. यावेळीं साडेचारशें पर्यंत मंडळी हजर असून बहुतेक शेवटपर्यंत राहिली.

'नेबरहूडहाऊस' किंवा समाजसेवागृह—हें सेवागृह गेल्या फेब्रुवारी ७ तारखेस उघडण्यांत येऊन ख्रिस्ती व ख्रिस्तीतर तरुण मंडळींची मोठी सोय होऊन त्याचा शारीरिक, मानसिक व नैतिक उन्नति करण्याचें कामीं फार मोठा उपयोग होत आहे. डॉ. व मिसेस मॅन्सहार्ट व आमच्या मंडळीचे एक वडील, बंधु पटेट यांची या गृहांत शुद्ध नैतिक वातावरण उत्पन्न करण्याचें कामीं मोठी सेवा चालूं आहे. तसेंच त्यांच्या अर्थसंबंधी बाबींकडेही लक्ष पुरविण्यांत येऊन त्यांस उद्योगधंदे लावून देण्याचें कामीं यांचे मोठे यत्न चालूं आहेत. समाज-सेवेच्या दृष्टीनें या मंडळींतील बंधुभगिनींस सेवेचें मोठें कार्यक्षेत्र उघडें झालें आहे. तसेंच या वसतिगृहांतील ख्रिस्ती तरुण मंडळीकरितां सेवेचें द्वार या मंडळीसंबंधानें सदा खुलें आहे व हिचे सेवेचा फायदा ते करून घेतील अशी या मंडळीची मोठी आशा आहे.

मिशन हायस्कूल—ही शाळा व हिच्यासंबंधीं असणाऱ्या मुलामुलींच्या सहभोजनशाळा आज अर्धे शतकभर या मंडळीचे वाढीस प्रमुख साधन झाल्या आहेत म्हणून ही मंडळी प्रभूची उपकारस्तुति करिते. हिची स्थापना व अभिवृद्धि ज्या मिशनेरी दंपत्याचे हातून झाली तीं रेवरेंड व मिसेस इ. एस्. ब्लूम हात. त्यांनीं आपलें तनमनधन खर्चे करून व प्रभूवरील अढळ विश्वासानें ही अत्यंत उपयुक्त संस्था उर्जितावस्थेस आणिली. या मंडळींतील बहुतेक प्रमुख कुटुंबें या शाळेतून शिक्षण पावून निघालीं आहेत. या मंडळीचे वडील कारभारी यांच्याकडे अलीकडे या शाळेचें चालकत्व असून त्यांच्या अविश्रांत परिश्रमानें हिची सुस्थिति

झाली आहे म्हणून आम्ही प्रभूची स्तुति करितों. या शाळेंत मिळणाऱ्या उत्तम शिक्षणाशिवाय ह्यांतील तरुण मंडळीचे आध्यात्मिक स्थितीकडे ह्यांचें व ह्यांच्या पत्नींचें विशेष लक्ष आहे यावरून मंडळीस संतोष वाटतो. या शाळेचे 'ज्युबिली'चा उत्सव या मंडळीचें शतवर्षोत्सवाबरोबरच होणार आहे.

शतवर्षोत्सव फंड—या मंडळीच्या ह्या फंडाकरितां ह्या वर्षी रु. १८२३ मिळाले असून ही बहुतेक रक्कम या मंडळींतील बंधुभगिनींनीं दिली आहे. गेल्या सालीं मिळालेली रक्कम धरून एकंदर या फंडांत या वर्षाखेर रु. २८४७ मिळाले आहेत. हा शतवर्षोत्सव फंड म्हणजे या योद्धी मंडळींतून वरील विजयी मंडळींत गेलेले मिशनेरी, पाळक व बंधुभगिनी यांच्या सेवेबद्दल आमच्या प्रभूचे उपकारस्तुतिप्रीत्यर्थ उभारलेली आर्थिक सेवा होय. या मंडळींतील प्रत्येक बंधुभगिनीनें तसेंच हिच्या मित्रमंडळीनें प्रभूनें आपणांस जीवनाच्या प्रकाशांत आणिल्याबद्दल उपकारस्तुतिप्रीत्यर्थ या स्तुत्य सेवला हातभार लावण्याची ही सुवर्ण संधि दवडूं नये. या मंडळींतील बऱ्याच बंधु भगिनींनीं खराच स्वार्थत्याग करून ह्या सेवेचे भागी झाले आहेत याबद्दल प्रभूची स्तुति असो! **'आणि घेणें यापेक्षां देणें हें अधिक आशीर्वादित आहे, हे प्रभु येशूचे शब्द, त्यानें स्वतः सांगितलें, त्याची आठवण करावी.'**

सांपत्तिक स्थिति—जरी मंडळीची शिल्लक विशेष नाहीं तरी एकंदरीनें पाहिलें असता मंडळीची सांपत्तिक स्थिति फार समाधानकारक आहे. याचें मुख्य कारण हें कीं, मंडळीनें आपल्या नित्याचा खर्च भागवून वरील शत-वर्षोत्सव फंडाला गत वर्षी रु. १०२४ व या वर्षी रु. १४२३ दिले आहेत. मंडळीचे खर्चाकरितां रु. २७४० व इतर सेवेकरितां रु. ४१८ याशिवाय शुभवृत्तप्रसारा-करितां रु. ३२५. एकंदरीनें या मंडळीनें या वर्षी रु. ४६१७ दिले आहेत.

या स्थळीं हें नमूद करणें अवश्य आहे कीं, या मंडळींतील कित्येक बंधु भगिनी तीन वर्षांमागें या मंडळींत झालेल्या धर्मसंजीवनाच्या सभेच्या वेळीं केलेल्या प्रतिज्ञेप्रमाणें आपल्या उत्पन्नाचा दशांश वेगळा काढून ठेवून देवाचे निरनिराळ्या कार्याला स्वसंतोषानें व औदार्यानें देतात याबद्दल प्रभूची स्तुति असो.

'होम मिशन'—आगस्ट २८ तारखेस बाँबे चर्च कौन्सिलचे वतीनें आलेले शिष्ट मंडळानें या मंडळीची भेट घेऊन व शुभवृत्तप्रसाराचे कामीं ह्या कौन्सिलाचे वतीनें 'होम मिशन' असण्याचें अगत्य दर्शवून या दिशेनें या मंडळानें कौन्सिलमधील इतर मंडळ्यांबरोबर औदार्यानें मदत करावी म्हणून विनंति केली. मंडळीनेंही या स्तुत्य कामीं शक्य तितकी मदत करूं म्हणून अश्वासन दिलें. त्याप्रमाणें आतां नुकतेंच कौन्सिलनें ठरविल्याप्रमाणें पुण्याजवळील चाकण या स्थळीं या होम मिशनचें काम उघडावें असें ठरलें. तसेंच या मंडळीनें या शहरीं चालूं असलेलें आपलें काम संभाळून ह्या होम मिशनचे कामाला पुढचे वर्षी रु. १२० द्यावें म्हणून ठरविलें आहे. याप्रमाणें या मंडळी पुंढ हें शहर, होम मिशन व एन. एम. एस. किंवा भारत ख्रिस्ती सेवक मंडळ अशीं तीन कार्यक्षेत्रें शुभवृत्तप्रसाराकरितां आहेत. **प्रभु** ख्रिस्त आम्हांस म्हणत आहेत **'जो कोणी आपला जीव वांचवायास इच्छितो तो त्याला गमावील आणि जो कोणी मजकरितां व शुभवर्तमानाकरितां आपला जीव गमावील तो त्याला वांचवील.'**

संडे स्कूल—मंडळींतील लेकरांकरितां तसेंच तरुण मंडळीकरितां 'प्रभूच्या दिवशीं' म्हणजे रविवारीं देवाचे वचनासंबंधीं शिक्षण देण्याचे कामीं ही संस्था किती उपयुक्त आहे हें सांगणें नको. या वर्षी ह्या शाळेचे चालकत्व आमच्या एका अनुभविक वडिलाचे हातीं असून त्यांस इतर कित्येक वडिलांनीं मनापासून मदत केली आहे. तसेंच लहान वर्गाचे चालकत्व आमच्या वडिलांतील एका बहिणीचें हातीं कित्येक वर्षें असून तिनें ही बाळकांची सेवा झटून केली याबद्दल आम्हांस संतोष वाटतो. अलीकडे या शाळेची पुनर्घटना होऊन हिचें काम समाधानकारक रीतीनें चालूं आहे. संडेस्कूलनंतर अर्धा तास आमचे एक मिशनेरी बंधु शिक्षकांस शिक्षणाचे विषयावर उपयुक्त सूचना करितात. तसेंच दादरावरील अंध शाळेची व्यवस्था आमच्या एका वडिलाकडे असून तीही समाधान कारक रीतीनें चालूं आहे. **प्रभु** म्हणत आहेत **'बाळकांस माझ्याजवळ येऊं द्या, त्यांस मना करूं नका, कारण कीं देवाचें राज्य असल्यांचेंच आहे,'** या वचनाकडे आईबापांनीं विशेष लक्ष पुरवावें.

'डार्कस सोसायटी'—या मंडळींतील आमच्या बहिणींची ही उपयुक्त संस्था असून व ह्या महिन्यांतून एकदां एकत्र जमून कांहीं जनसेवेचीं कामें करीत असतात. या वर्षी माटुंग्याच्या गरीब लोकांस कांहीं कपडे वाटण्यांत आले. यांचें लक्ष आत्मोन्नतीकडेही असतें. या मंडळींतील **प्रत्येक** बहिणीनें आपल्या ह्या उपयुक्त संस्थेचे वर्तन कांहीं विविक्षित सेवा हातीं घेतल्यास या मंडळीची सेवा व इतर जनसेवेचीं कामें किती तरी होतील !

ख्रिस्त व्यवसायी मंडळ—यासंबंधीं अगणाऱ्या मुलामुलींच्या सभा नियमित रीतीनें चालत असून तीं आपापलीं सेवेचीं कामें करीत असतात. **'लहान गोष्टींच्या दिवसाला कोणीं तुच्छ मानिलें आहे ?' 'देवाचें राज्य मोहरीच्या दाण्यासारखें आहे....तो सर्व दाण्यांहून लहान आहे खरा, पण तो वाढल्यावर...मोठा असतो व (त्याचें) झाड होतें, तें असें कीं आकाशांतील पांखरें येऊन त्याच्या फांद्यांत राहतात,**

मंडळीसंबंधीं घडलेल्या विशेष गोष्टी.

मंडळीच्या वडिलांची सेवेची कामीं स्थापना—नोव्हेंबर २८, १९२६ रविवारीं विशेष उपासना होऊन नवीन वडिलांस मंडळीच्या सेवेकरितां वेगळे करण्यांत आलें.

वार्षिक उपासना—दिसेंबर ५, १९२६ रविवारीं ही विशेष उपासना होऊन त्यावेळीं मंडळीचा वार्षिक रिपोर्ट वाचण्यांत आला.

ख्रिस्तजयंति व नववर्ष—सालाबादप्रमाणें ख्रिस्तजयंतीचे आधल्या रात्रीं लेकरांकरितां गाणीं व 'ख्रिस्मसट्री' होऊन ख्रिस्तजयंतीच्या सकाळीं उपासना झाली. तसेंच नववर्षाचे सकाळीं उपासना होऊन सायंकाळीं सर्व मंडळीचें प्रीतिभोजन झालें. **'पाहा बंधूंचें ऐक्यानें एकत्र राहाणें किती उत्तम व किती मनोरम आहे !'**

कानडी मंडळी—मेथडिस्ट चर्चचे संबंधांतील कानडी मंडळीचे १००-१२५ सभासद कांहीं कारणावरून वेगळे होऊन आमच्या मंदिरांत उपासना करूं लागले. पण **प्रभूच्या** कृपेनें त्यांचा मिलाफ होऊन ते पुनः एक झाले ह्याबद्दल प्रभूची स्तुति असो.

वेस्लीयन चर्च—या चर्चच्या इंग्लिश उपासना ह्यांचे मंदिराची दुरुस्ती होत असल्याकारणानें कांहीं काळ आमच्या मंदिरांत झाल्या.

स्वागतपर व निरोप घेण्याच्या सभा—नोव्हेंबर २७ रोजीं डॉ. व मिसेस मॅन्सहार्ट हें नवीन मिशनेरी दंपत्य आम्हांमध्यें समाजसेवेचें काम चालविण्यास आलें, तसेंच आमचा तरुण बहीण ताराबाई टिळक ही इंग्लंडांत जाऊन समाजसेवेचें शिक्षण मिळवून ह्या शहरांत ही सेवा करणार म्हणून मंडळीनें त्यांचे स्वागत केलें. तसेंच आमचे मंडळीचे वडील कारभारी यांस सरकारानें ऑनररी प्रेसिडेन्सी मॅजिस्ट्रेट नेमून ह्या शहराची सेवा करण्याचा हा जादा प्रसंग दिला म्हणून मंडळीनें त्यांचें अभिनंदन केलें.

तसेंच त्याच बैठकींत आमचे बंधु दत्तोपत टिळक हे येथील कार्यक्षेत्र सोडून नाशिकास कायमचे जात आहेत, तसेंच डिसेंबर १४ रोजीं डा. व मिसेस क्लार्क यांस अहमदनगरास जाण्याचें अगत्य पडल्यामुळें हीं आमचबांतील आपली सेवा सपवून जात आहेत म्हणून मंडळीनें त्यांचा दुःखानें निरोप घेतला.

व्यक्तींची सेवा—आमच्यांतील एका बंधूनें पूलपिटावरील सुंदरसा कठडा बऱ्याच खर्चानें बांधून आपलें देवाचे मंदिरावरील आपले प्रेम व्यक्त केलें. तसेंच एका बंधूनें मंडळीचीं उपासनासंगीताचीं पुस्तकें व पवित्रशास्त्राची जुनी झालेली प्रत यांची सुरेख बांधणी करून आपलें मंडळीवरील प्रेम व्यक्त केलें. एका तरुण बहिणीनें उपकारस्तुतीचें दान म्हणून स्तोत्रांची ४५ पुस्तकें मंडळीला नजर केलीं. एका तरुण भावानें प्रभूनें आपणास आजारांतून उठविलें म्हणून आपल्या ऐपतीप्रमाणें अल्पसें दान दिलें. एका बहिणीनें देवाज्ञा झालेल्या आपल्या एकुलत्या पुत्राचें स्मरणार्थ या मंदिरांतील खालचे उपदेशपीठ सत्रंजीनें सुशोभित केलें आहे. तसेंच एक गरीब विधवा गरिबांची आठवण करून आपल्या शक्तीप्रमाणें नियमित रीतीनें अल्पशी मदत करीत असते. **प्रभु ख्रिस्त** म्हणतात "**मी तुम्हांस खचीत सांगतों कीं, जे भांडारांत टाकीत आहेत त्या सर्वांपेक्षां या दरिद्री विधवेनें अधिक टाकिलें. कां कीं, त्या सर्वांनीं आपल्या भरपुरांतून टाकिलें. परंतु हिनें आपल्या कमताईतून टाकिलें**" कित्येक द्रव्यदानाशिवाय **जात्या** या मंदिराची सेवा स्वसंतोषानें करितात. त्यांतून एका बंधूची सेवा या मंदिराचे इलेक्ट्रिक दिवे व उपासनेचे वेळीं इतर

सेवा कित्येक वर्षें मोठ्या संतोषानें चालूं आहे. तसेंच आमच्या वयोवृद्ध व अनुभववृद्ध मिशनेरी भगिनी मंदिरांतील उपासनांचे वेळीं राजाची मोठी पेटी कित्येक वर्षे वाजवून आपलें या मंडळीवरलें प्रेम व्यक्त करीत आहेत. कित्येकांची कोणास न कळत होत असलेली आपली गुप्त सेवा चालूं आहे. उदा० एका व्यक्तीनें कांहीं काळामागें शुभवृत्तप्रसाराची सेवा या मंडळीनें हातीं घ्यावी म्हणून गुप्त द्रव्यदान करून या मंडळीस आपल्या कर्तव्याची जाणीव करून दिली. तसेंच दुसऱ्या एका व्यक्तीनें कोणास न कळत पवित्र शास्त्राचे सुधारलेल्या भाषांतराची एक प्रत मंदिरांतील पाळकाचे ध्यान मनन करण्याचे खोलींत त्याच्या उपयोगाकरितां आणून ठेविली. यावरून अशा व्यक्तींनीं अम्हांस प्रभु येशूच्या वचनाची आठवण करवून दिली आहे. **'तूं जेव्हां दानधर्म करितोस तेव्हां तुझा उजवा हात काय करितो हें तुझ्या डावा हाताला कळू नये; यासाठीं कीं तुझा दानधर्म गुप्तांत व्हावा आणि तुझा पिता जो गुप्तांत पाहातो तो तुला प्रतिफल देईल.'** तसेंच प्रभु येशू ह्यांस व इतरांस म्हणत आहेत **"मी तुम्हांस खचीत सांगतों कीं, जो कोणी शिष्याचे नांवानें या लहानांतील एकाला केवळ पेलाभर थंड पाणी प्यायाला देईल तर तो आपल्या प्रतिफळाला मुकणारच नाहीं."**

नवीन सभासद—ह्यावर्षी **विश्वासावरून** मंडळींत जीं प्रविष्ट झालीं तीं हीं होतः-आवंतिकाबाई बाजीराव गोडें, विमलाबाई सलोमी मलेलू, आवंतिकाबाई अमोलिक, मालनबाई थामस, दयाबाई बंदसोडे, कुसुमबाई गांधी, सरोजिनीबाई ना. गायकवाड, मिल्काबाई ए. वासकर, शशिकुमार ना. गायकवाड, बेंजामीन शिंदे, भास्कर जे. साळवे, बाबू कृष्णाजी बंदसोडे, इम्यानुएल रुबेन महाजन, भाऊराव डी. अमोलिक, स्यामुएल ना. चक्रनारायण, डॉनिएल दस्तुर जलाल, जॉन चिंतामणराव कोशे.

परवानगीपत्रानें जीं प्रविष्ट झालीं:—भाऊराव मकासरे, मेरीबाई अमोलिक, रेव. क्लिफर्ड मॅन्सहार्ट, मिसेस क्लिफर्ड मॅन्सहार्ट, जेम्स बोर्डे, सुमतीबाई बोर्डे, केशवराव ए. बोर्डे, मिर्यमबाई बर्नार्ड, सरूबाई साळवे, गिरजाबाई चा. त्रिभुवन, चंद्रभानजी चक्रनारायण.

लेंकरांचे बाप्तिस्मेः—विमल सहाद घाटे, सेरा रोहिनी साबळे, पद्माकर इमॅन्युएल गायकवाड, वसंत हिरालाल बोर्डे, स्यामुएल दामोदर अमोलिक, स्यामुएल भालचंद्र पवार, हन्ना शालिनी पवार, पुष्पा बेंजामिन सदनकर, फिलिप प्रमोद शामसुंदर मलेलू, वसंत थामस माने, सुशिला वामनराव गायकवाड, सुमंत माधवराव नरवडे, स्नेहलता बंडू चक्कनारायण, वत्सला विल्सन नलबंसी, शारदा ग्रेस त्रिभुवन, थामस ब्रुस्टर मॅन्सहार्ट, देवदत्त चार्लस गोम्स, केशव डॅनिएल कळकुबे, जयसिंग जेम्स, भास्कर एबिनेजर जाधव, नलिनी मनोरमा वीरकर.

मृत्यु—यावर्षी ज्यांस प्रभूनें आपल्या वरील गृहीं बोलाविलें त्यांचीं नांवें:— आनंदीबाई घोडके, बखुरदास महादेव व मिसेस जेप्रथम.

लेंकरांचें मृत्युः—प्रेमा प्रिसिल्ला अंब्रे व वसंत थामस माने शांतीचा देव यांच्या मातापितरांस व आप्तेष्टांस शांति देवो ! प्रभू येशू ह्यांस म्हणतात, **'जे शोक करितात ते धन्य, कारण कीं, ते सांत्वन पावतील.'**

चर्चसंबंधी इतर माहिती—या वर्षी प्रभुभोजन घणारे पुरुष १७६, स्त्रिया १५३, एकंदर ३२९ सभासद. एकंदर लेंकरांची संख्या १९७, मंडळीशीं संबंध ठेवणारे ५५, एकंदर लहान थोर मंडळी ५८१. याशिवाय बाहेर गांवांहून आलेल्या ख्रिस्ती लोकांचा भरणा बराच मोठा असून त्यांची सेवा आमचे बंधु रेव. सुमंतराव डोंगरे करितात. यावर्षी बॉम्बे युनिव्हर्सिटीचे एम्. बी. बी. एस. चे परीक्षेंत यशस्वी झालेल्या विद्यार्थ्यांपैकीं आमच्या मंडळींतील दोन सभासद होते. तसेंच एल एल. बी. चे परीक्षेंत यशस्वी झालेल्यांमध्यें आमचे एक बंधु होते. ह्या तिघांनींही आपापल्या सेवेस आरंभ केला आहे म्हणून प्रभूची स्तुति असो.

समारोप—शेवटीं, म्ह० या मंडळींचें पूर्णशतकाचे शेवटीं ज्या **"ख्रिस्तांनीं मंडळीवर प्रीति केली....आणि त्यांनीं तिच्याकरितां आपणाल अर्पून दिलें, यासाठीं कीं त्यांनीं तिला (आपल्या) वचनानें..निर्मळ करून पवित्र करावें, याकरितां त्यांनीं ती मंडळी गौरवी अशी ती आपणांस सादर करावी, तिला डाग किंवा सुरकुती किंवा अशा**

सारिखें कांहीं नसावें तर ती पवित्र आणि ठपक्याविरहित असावी," त्याच ह्या मंडळीला आतांही प्रभु म्हणत आहेत. 'स्वर्गांत व पृथ्वीवर सर्व अधिकार मला दिलेला आहे. यास्तव तुम्ही जाऊन सर्व राष्ट्रांस शिष्य करा...ज्या कांहीं गोष्टी मी तुम्हांस आज्ञापिल्या त्या सर्वच पाळायास त्यांस शिकवा; आणि पाहा, जगाच्या समाप्तीपर्यंतही मी सर्वकाळ तुम्हांबरोबर आहे.' पाहा, 'शिष्य आपल्या गुरूपेक्षां थोर नाहीं व दास आपल्या धन्यापेक्षां थोर नाहीं. शिष्य आपल्या गुरूसारखा व दास आपल्या धन्यासारखा व्हावा, हें त्याला पुरें आहे...जर कोणी माझ्यामागें यायास इच्छितो तर त्यानें आपणाला नाकारावें व आपला क्रूस उचलून घ्यावा व माझ्यामागें यावें. जो आपला क्रूस उचलून घेऊन माझ्या मागें येत नाहीं तो मला योग्य नाहीं.' या प्रभूच्या आज्ञेप्रमाणें ज्या प्रमाणावर जशी प्रत्येक व्यक्ति तशीच मंडळी स्वपरित्याग करून व आपला क्रूस उचलून घेऊन प्रभूच्या सेवेचा व शुभवर्तमानाचा कार्यक्रम स्वीकारून तो पार पाडते त्याप्रमाणें ती व्यक्ति किंवा मंडळी जिवंत राहून प्रभु खिस्ताला प्रकट करणार आहे. प्रभु खिस्त आम्हांस म्हणत आहेत 'मरणापर्यंत विश्वासू ऐस, म्हणजें मी तुला जीवनाचा मुगुट देईन'...'होय मी लवकर येतों.' 'आमेन...हे प्रभु येशू ये.'

HUME MEMORIAL CHURCH.

Annual Statement of Accounts 1926–27.

I. General Fund.

	Rs. a. p.	Rs. a. p.		Rs. a. p.	Rs. a. p.
To **Balance**—			By **Salaries & Allowances**—		
In P.O.S.B. Gen. Fund.	14 4 2		Pastor's Allowance ...	1,800 0 0	
,, ,, Evan. ,,	19 0 0		Sexton's Salary	322 8 0	
,, ,, Dinner ,,	27 8 0		Acting Sexton	25 5 6	
	60 12 2				2,147 13 6
Fixed Deposit (K.C.S.).	200 0 0		,, **Other Congregational Expenses**—		
Cash with Treasurer...	182 15 9½				
		443 11 11½	Travelling & Conveyance	81 9 3	
,, **Subscriptions**		2,228 7 0	Printing	38 8 0	
,, COLLECTIONS—			Electric Bill	64 10 0	
Sunday Services ...	294 7 2		Ground Rent	144 0 0	
Friday Prayer Meetings	11 0 10		Bombay Church Council Assessment	40 0 0	
N.M.S. Sundays ...	10 6 0				
X'mas Day	50 0 0		Sundries	28 6 0	
New Year's Day ...	17 10 0				397 1 3
Good Friday	9 5 10				

HUME MEMORIAL CHURCH.

Annual Statement of Acoounts 1926–27—contd.

I. General Fund—*contd.*

	Rs. a. p.	Rs. a. p.		Rs. a. p.	Rs. a. p.
			By New Year's Dinner & X'mas Tree		196 0 0
Hospital Sunday ...	12 0 0		,, DONATIONS &c.—		
Gujerath Flood Relief.	18 13 0		Poor Fund	56 0 0	
		423 10 10	N. M. S.	20 4 0	
To **Special Subscriptions**—			Easter Mela	10 0 0	
New Year's Dinner & X'mas Tree... ...	233 0 0		H. E. Sir Leslie Wilson Hospital Fund... ...	12 0 0	
N. M. S.	4 0 0		Gujerath Flood Relief Fund	20 0 0	
		237 0 0			118 4 0
,, **Miscellaneous**—			,, **Balance**—		
Donation from Wesleyan Church... ...	150 0 0		In P. O. S. B. General Fund ...	264 4 2	
Interest on Fixed Deposit	12 0 0		,, Evan. Fund...	19 0 0	
			,, Dinner ,, ...	64 8 0	
S.S. Collection for Gujerath Flood Relief..	1 3 0			347 12 2	
		163 3 0	Fixed Deposit (K.C.S.) ...	200 0 0	
			Cash with Treasurer ...	89 1 10½	
					636 14 ½
	TOTAL Rs...	3,496 0 9½		TOTAL Rs...	3,496 0 9½

HUME MEMORIAL CHURCH.

Annual Statement of Accounts 1926–27.

II. Endowment Fund.

	Rs.	a.	p.		Rs.	a.	p.
To 4% B.P.T. Bond	1,000	0	0	By 4% B. P. T. Bond	1,000	0	0
,, 5 Year P. O. Cash Certificates	922	8	0	,, 5 Year P. O. Cash Certificates... ...	922	8	0
,, Balance in P. O. S. B.	66	0	6	,, Balance in P. O. S. B.	86	0	6
,, Interest on B. P. T. Bond	40	0	0	,, Cash with Treasurer	20	0	0
TOTAL Rs...	2,028	8	6	TOTAL Rs...	2,028	8	6

III. Poor Fund.

	Rs.	a.	p.		Rs.	a.	p.
To P. O. Cash Certificate	15	0	0	By P. O. Cash Certificate	15	0	0
,, P. O. S. B.	3	15	0	,, P. O. S. B.	3	15	0
TOTAL Rs...	18	15	0	TOTAL Rs...	18	15	0

HUME MEMORIAL CHURCH.

Annual Statement of Accounts 1926–27.

IV. Furniture Fund.

	Rs.	a.	p.		Rs.	a.	p.
To P. O. Cash Certificate	37	8	0	By P. O. Cash Certificate	37	8	0
,, P. O. S. B.	2	15	8	,, P. O. S. B.	2	15	8
TOTAL Rs...	40	7	8	TOTAL Rs...	40	7	8

Examined and found correct.

P. H. Karmarkar,
Honorary Auditor.

D. V. Powar,
Hon. Treasurer.

V. Evangelistic Fund.

	Rs.	a.	p.		Rs.	a.	p.
To Balance...	0	14	6	By Salary of Evangelist	480	0	0
,, Subscriptions	325	12	0	,, Conveyance	52	8	3
,, Colportage Grant from Bible Society...	240	0	0	,, Balance	34	2	3
TOTAL Rs...	566	10	6	TOTAL Rs...	566	10	6

V. S. Gaikwad,
Hon. Treasurer.

HUME MEMORIAL CHURCH.

VI. Church Centenary Fund.

	Receipts up to 30th Sept. 1926.			Receipts during year ending 30th Sept. 1927.			TOTAL.		
To Donations & Contributions	1,021	0	0	1,670	8	6	2,691	8	6
,, Sale of Tickets	0	0	0	112	0	0	112	0	0
,, Interest	3	3	0	40	10	0	43	13	0
Total Rs...	1,024	3	0	1,823	2	6	2,847	5	6

T. Buell,

J. S. S. Malelu,

Jt. Hon. Treasurers.

List of Subscribers to the Church Fund 1927-28.

	Rs.	as.
Adhav Mr. & Mrs. R. B.	1	0
,, ,, ,, S. R.	0	12
,, ,, ,, R. M.	0	12
,, Miss Malanbai	0	12
Aloni Miss Sundrabai	6	0
Amolik Miss Marybai	5	0
,, Mr. & Mrs. D. G.	12	0
,, Mr. B. D.	3	0
Angre Mr. &. N. B.	4	0
Anthony Baboorao	1	0
Bandsode Mr. & Mr. K. C.	50	0
Batellu Mr. Kamalabai	6	0
,, Miss Sunitibai	15	0
Bhalekar Mr. & Mrs. K. A.	0	8
,, ,, ,, Y. A.	0	8
Bhosle Mrs. Karunabai	5	0
Bodhak Mr. & Mrs. S. R.	3	0
Borde Mr. & Mrs. S. T.	3	0
Boarde Mr. & Mrs. James T.	1	0
,, Mr. H. T.	8	0
Boyd Mr. & Mrs. Adrian	24	0
Benny Mrs. Anandibai P.	8	8
Bhagwandas Miss Tarabai	1	0
Bhise Narbadabai	4	0
Buell Mr. & Mrs. T.	121	8
Chakranarayan Mr. & Mrs. R. C.	10	0
,, Mr. Prabhaker C.	5	8
,, Mr. & Mrs, A.	14	0
,, Nurse Sushilabai	2	0
,, Mr. S. C.	12	8
,, Mr. S. N.	1	0
,, Mr. Davidrao	3	0
Chavan Miss Shantibai	2	0
,, Mr. & Mrs. Baboorao	10	0
Deshmukh Mrs. Venoobai N.	9	0
Dongre Rev. & Mrs. S. R.	7	0
Edwards Rev. J. F.	66	0
Gaikwad Mr. & Mrs. D. S.	3	0
,, ,, ,, V. S.	126	0
,, ,, ,, R. S.	5	0
,, ,, ,, J. R.	1	0
,, Mrs. Gracebai N.	15	0
,, Miss Sonoobai	12	0
,, Mr. G. B.	4	0
,, Mr. S. W.	2	0
,, Mr. Vamanrao S.	4	0
Gavali Nurse Malanbai	9	0
Gates Mrs. R. V.	66	0
George Mr. T. M.	2	0
Gomes Mr. & Mrs. Peter	1	8
Harrison Mr. M R.	22	0
Hivale Mr. & Mrs. K. T.	2	0
,, ,, ,, Vamanrao	5	0
Hongal Mr. & Mrs. Y. A.	45	0
Jadhav Miss Gangoobai	60	0
Jeejabai	9	0
Jiwajee Mr. & Mrs. Pratap	2	0
James Mr. & Mrs. T. R.	14	0
Jalal Mr. Samuel	1	0
Kamble Miss A. O.	18	9
,, ,, L. D.	7	8
Kamble Nurse Sagunabai	7	0
Karmakar Dr. Gurubai	60	0
,, Miss E. M.	3	0
,, Mr. & Mrs. P. H.	100	0
,, ,, ,, D.	11	0
,, ,, S. H.	3	0
Kesker Mr. Pandoorang	12	0
Kukde Mr. & Mrs. V. S.	78	0
Kukas Mr. Benjamin	35	0
Kshirasagar Mr. & Mrs. S. N.	12	0
Kumar Mr. D. and Mrs. Premabai	15	0
Mahadeo Mrs. P. B.	7	0

	Rs.	as.
Mahajan Mrs. Marybai	12	0
Makasare Mr. A. V.	4	0
Malelu Rev. & Miss M.	60	0
,, Mr. & Mrs. J. S. S.	125	0
,, ,, ,, James	33	0
,, Dr. G.	20	4
Mandavkar Mr. & Mrs. B. G.	5	0
Mane Mr. & Mrs. T. G.	80	0
Mayers Mr. & Mrs. M.	8	0
Modak Mr. & Mrs. V. S.	25	0
,, Mrs. K. S.	14	0
,, Miss Champoobai	9	0
Manshardt Dr. & Mrs. C.	121	0
Narvade Mr. & Mrs. K. B.	2	8
Navalkar Mr. Lukas	8	0
Nathan Mr. David	3	0
Nawagire Mr. & Mrs. S. T.	7	0
Nalbancy Mr. & Mrs. Wilson	3	0
Naweeja Y. Divekar		2
Ohol Mr. & Mrs. B.	2	0
Painter Mr. & Mrs. G.	11	0
Patet Mr. & Mrs. N. J.	48	0
Powar Mr. & Mrs. D. V. & Mother	36	0
,, ,, ,, Benjamin	3	10
,, Mrs. Dayabai	0	14
,, Mrs. Janakibai	24	0
,, Saibai Tatyaba	1	8
Pimpalkar Mr. K. R.	11	0
Pole Mr. & Mrs. C. J.	1	8
Rahator Nurse Sundrabai	8	0
Sable Mr. & Mrs. G. G.	22	0
Samuel Mr. S. V.	2	0
Sadankar Mr. & Mrs. B. A.	12	0
,, Mrs. Jacob	6	0
,, Mr. & Mrs. Dhanwant	0	8
,, ,, ,, Peter	9	0
,, Mr. Mathur	1	0
,, Mr. Motilal Bhoja	2	0
Salve Mr. & Mrs. S. M.	4	0
,, ,, S. G.	2	8
,, Nurse Sarubai M.	30	0
Shiralkar Mr. & Mrs. P.	9	0
Sarode Mrs. V. K.	12	0
Shinde Mr. & Mrs. J. B.	6	0
,, ,, ,, Samuel	6	0
Singh Mr. & Mrs. J. N.	17	0
Shelke, Mr. & Mrs. D. V.	3	8
Thombre Miss Malanbai	18	0
Thomas Mrs. Saroobai	3	0
Tilak Mr. & Mrs. D. N.	14	0
,, Miss T. N.	27	0
Tatpati Mr. Edwards	3	0
Tribhuvan Mrs. C. C.	5	0
,, Mr. James R.	1	8
,, Mr. P.	0	12
Vircar Mr. & Mrs. T. A.	3	0
Vaidande Miss Sundrabai	11	0
,, Nurse Gangoobai	11	0
Waghmare Mr. & Mrs. N. L.	55	0
,, ,, ,, K. M.	8	0
Waskar Mr. & Mrs. E. A.	15	0
Wanesa Mr. & Mrs. Joseph	41	12

Church Centenary Fund.

Contributions received from February 1926 to Sept. 1927.

	Rs.	as.
Acquilla, Mr. and Mrs. N. S.	5	0
Adams, Mr. R. A.	10	0
Anonymous	10	0
Avery, Miss G. S.	30	0
Batelu, Miss Sunitibai	35	0
Batelu, Misses Sulochanabai and Sushilabai	3	2
Bissell, Dr. E. R.	200	0
Borde, Mr. and Mrs. S. T. (Baramati)	5	0
Borde, Mr. S. Y.	5	0
Boyd, Mr. and Mrs. A. B.	40	0
Buell, Family	114	0
Clark, Dr. and Mrs. A. H.	200	0
Cornelius, Mr. J. C.	50	0
Dady, Mr. D. R.	400	0
Edwards, Rev. J. F.	160	0
Gaekwar, Mr. A. B.	40	0
Gaikwad, Mr. and Mrs, D.S.	12	0
Gaikwad, Mr. and Mrs. K. S.	75	0
Gaikwad, Miss Sonubai	8	0
Gaikwad, Mr. V. S.	56	0
Gates Mrs. K. V.	150	0
Gokavi, Mr. C. G.	5	0
Gomes, Mr. and Mrs. P.	5	0
Jadhav, Miss Gangubai	131	0
Kamble, Miss A. D.	32	8
Karmarkar, Dr. G.	80	0
Karmarkar, Miss E. M.	25	0
Karmarkar, Mr. and Mrs. P. H.	10	0
Keskar, Mr. and Mrs. Annappa	75	0
Kshirsagar, Mr. & Mrs. S. N.	1	8
Kukde, Mr. and Mrs. S. P.	25	0
Kumar, Mr. Dayanand	13	0
Kukas, Mr. B. G.	15	0
Lazarus, Mr. and Mrs. E. G.	50	0
Mahadeo, Mr. and Mrs. B.	15	0
Mahajan, Mrs. M.	20	0
Makasare, Mr. A. V.	14	0
Malelu, Family	216	0
Mane, Mr. and Mrs. T. G.	9	0
Manshardt, Dr. and Mrs. C.	30	0
Narwade, Mr. and Mrs. K. B.	6	0
Nevasker, Mr. and Mrs. S.R.	10	0
Painter, Mr. and Mrs. G.	4	0
Parmar, Mr. Budar	15	0
Patet, Mr. and Mrs. N. J.	38	0
Pole, Mr. and Mrs. C. J.	2	0
Powar, Mr. and Mrs. D. V.	39	0
Salve, Miss Sagunabai	3	0
Salway, Miss Sarubai M.	15	0
Sarode, Mrs. V. K.	10	0
Shinde, Mr. P. K.	15	0
Sonalker, Mr. Shivram	0	8
Teckchand, Dr. Miss M.	30	0
Thombre, Miss M.	20	0
Tilak, Mr. and Mrs. D. N.	75	0
Tilak, Miss T. N.	18	0
Wanamaker, Mrs. O. D. ($4)	10	14½
Total Rs.	2,691	8½

List of subscribers to the Evangelistic Fund for 1926-27.

	Rs.	a.
Amolik, Mr. B. D.	2	8
Amolik, Mr. D.	1	4
Amolik, Miss N. M.	3	0
Avery, Miss G. S.	4	0
Bansode, Mr. & Mrs. K. C.	11	0
Batelu, Miss S. M.	3	0
Bissel, Dr. E. R.	22	0
Boyd, Mr. & Mrs. A.	6	0
Buell, Mr. & Mrs. T.	5	0
Chakranarayan, Mr. & Mrs. A.	5	8
Chakranarayan, Mr. C.	2	8
Chakranarayan, Mr. P. C.	6	0
Chakranarayan, Mr. R. C.	5	0
Chakranarayan, Mr. S. C.	12	0
Chakranarayan, Mr. S. N.	2	8
Clarke, Dr. A.	3	0
Dive, M. D. B.	12	0
Edwards, Rev. J. F.	12	0
Gaikwar, Mr. K. S.	6	8
Gaikwad, Mr. D. S.	12	0
Gaikwad, Mr. V. S.	9	0
Gaikwad Mr. Wamanrao	4	0
Gavli, Mr. H. A.	2	0
Harrison, Mr. M. R.	11	0
Hongal, Mrs. Sundrabai	9	0
Jacob, Mrs. Bayabai	6	0
Jacob, Mrs. Marybai	6	0
Jadhav, Miss Gangubai	11	8
Jankibai, Nurse	6	8
Karmarkar, Mr. P. H.	6	0
Mayers, Mr. Manuel	1	12
Mandvakar, Mr. B. G.	1	12
Malelu, Rev. J.	10	0
Malelu, Mr. J. S S.	10	0
Mane, Mr. & Mrs T.	3	8
Manshardt, Dr. and Mrs C,	12	0
Modak, Mrs. K. S.	4	4
Narvade, Mr. & Mrs. M. B.	4	8
Ohol, Mrs. V. A.	2	0
Patet, Mr. J. N.	2	12
Powar, Miss Tarbai	3	8
Prasad, Mr. H.	2	8
Rankhambe, Mr. R. M.	0	8
Sable, Mr. G.	4	4
Salvey, Miss Sarubai M.	4	4
Shere, Mr. and Mrs.	2	0
Shinde, Mr. P. K.	12	0
Shinde, Mr. V. L.	1	0
Singh, Mr. J. N.	3	8
Tilak Mr. and Mrs. D. N.	6	0
Tilak Miss T. N.	4	0
Waghmare Mr. and Mrs. N.L.	7	0
Waidande, Messrs. Gangubai and Sundrabai	12	0
Wasker, Mr. E.	6	8
X. Y. Z.	7	0
Eleanor Vimla	1	0
Total Rs.	325	12

OFFICE-BEARERS FOR 1927–28.

Pastor :

John Malelu, Byculla, Bombay.

Elders' Board.

T. Buell, V. S. Gaikwad, N. J. Patet, V. S. Kukde, Rev. J. F. Edwards. Dr. Manshardt, J. S. S. Malelu, D. V. Pawar, T. G. Mane, A. Boyd, P. H. Karmarkar, N. L. Waghmare, Miss A. D. Kamble, Miss G. Jadhav, B. A. Sadankar, K. C. Bandsode, Y. Hongal, S. N. Kshirsagar.

Standing Committee.

Assisting Elders : Rev. Dr. Manshardt, N. J. Patet.

Hon. Secretary : V. S. Kukde.

Hon. Treasurer : D. V. Pawar.

Other Members : Rev. J. F. Edwards, T. Buell, V. S. Gaikwad, A. Boyd, T. Mane, J. S S. Malelu, S. N. Kshirsagar, Miss A. D. Kamble.

Co-opted Members : P. H. Karmarkar and Miss M. Thombre.

Sunday School.

Superintendent : V. S. Gaikwad.

Dorcas Society.

President : Mrs. S. N. Gaikwad.

Hon. Secretary : Mrs. S. Adangle.

Hon. Treasurer : Mrs. S. D. Pawar.

T. V. Press, Bombay.